# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनेतून CSR कॉन्क्लेव्हचे आयोजन यशस्वीरीत्या संपन्न**

दिनांक ०७ ऑगस्ट २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पनेतून मिरा भाईंदर शहराचा मूलभूत विकास व्हावा याकरिता व सन २०४७ पर्यंत शहराचा अत्याधुनिकरित्या कायापालट व्हावा या दृष्टिकोनातून CSR कॉन्क्लेव्ह : Transforming Mira Bhayandar@२०४७ चे आयोजन यशस्वीरित्या संपन्न झाले. असा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली आहे.

मिरा भाईंदर शहरातील शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण या मूलभूत विषयावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यासाठी देशातील पहिली CSR कॉन्क्लेव्ह संपन्न झाली. निती आयोग, आयआयटी मुंबई, CEGP ( शिक्षण शासन आणि धोरण केंद्र) ,आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया आणि बिसलेरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात मिरा भाईंदरसह इतर शहरातून शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रातील विशेष तज्ञ मार्गदर्शक, निमसरकारी कंपन्या, खाजगी विकासक, कंपन्याचे अधिकारी, NGO आणि इतर सामाजिक संस्था यांनी लक्षणीय उपस्थीती लाभली होती. मा. आयुक्त आणि इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

तदनंतर मा. आयुक्त यांनी आलेल्या समस्त मान्यवरांना CSR कॉन्क्लेव्ह विषयी विशेष माहिती देऊन शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण या विषयी असलेलं भविष्यातील योजना आणि धोरण याची सखोल माहिती दिली. Mira Bhayandar@२०४७ ही दृष्टी भारताच्या स्वातंत्र्याच्या १०० वर्षांच्या अनुषंगाने आहे. मिरा भाईंदर शहरातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध असतील असे भविष्य घडवण्याचे ध्येय महापालिकेचे आहे असे मा. आयुक्त यांनी सांगितले. या CSR कॉन्क्लेव्हचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शहरातील विकासक व संस्था यांच्याशी होणाऱ्या संवादातून प्रभावी उपक्रम राबविणे आणि मिरा भाईंदर शहराच्या भविष्याला आकार देण्यासाठी डायनॅमिक प्लॅटफॉर्म म्हणून काम करण्याचा होता. तदनंतर निधी छिब्बर (IAS) महासंचालक, विकास देखरेख आणि मूल्यमापन कार्यालय (DMEO), NITI आयोग, प्राध्यापक रवींद्र गुढी (माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट संबंध), आयआयटी मुंबई, संजय सिंग

प्रमुख, युनिसेफ-महाराष्ट्र कार्यालय या तज्ञांनी शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण याबाबत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबद्दल माहिती दिली. शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक पायाभूत सुविधा वाढवणे, डिजिटल साधने सादर करणे आणि वय १८ पर्यंत रोजगारक्षमता सुनिश्चित करण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षणाला प्रोत्साहन देणे याबाबत अँटोनी नेलिसेरी प्रमुख, स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशन, दिपेन शहा स्वयंसेवा कार्यक्रम-होप, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS), जीजी जॉन कार्यकारी संचालक, चाइल्ड हेल्प फाउंडेशन, सुशीला शास्त्री वरिष्ठ कार्यक्रम संचालक या तज्ञांद्वारे सविस्तर चर्चा करण्यात आली.

दिनेश मेहता प्रोफेसर एमेरिटस आणि प्रमुख, पाणी आणि स्वच्छता केंद्र, CEPT विद्यापीठ, गुजरात, प्रेरणा लांगा सीईओ, आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया, जगन शहा सीईओ, इन्फ्राव्हिजन फाउंडेशन आणि माजी संचालक, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अर्बन अफेयर्स, धवल आशरप्रमुख - शाश्वत शहरे आणि वाहतूक, जागतिक संसाधन संस्था, परेश पारसनीस विश्वस्त, सामूहिक गुड फाऊंडेशन या तज्ञांद्वारे पर्यावरण धोरणात शाश्वतता आणि वर्तुळाकार

अर्थव्यवस्था, टिकाऊ शहरी परिसंस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि हिरव्या जागांचा विस्तार करणे याबाबत चर्चा करण्यात आली.

आरोग्यसेवेत विशेषतः सुविधांमध्ये सुधारणा करणे, वैद्यकीय उपकरणांचा प्रवेश सुनिश्चित करणे आणि मजबूत प्राथमिक आरोग्य सेवा प्रणाली स्थापित करून शहरातील नागरिकांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देणे याबाबत राजीव सदानंदन सीईओ, हेल्थ सिस्टम ट्रान्सफॉर्मेशन प्लॅटफॉर्म आणि माजी अतिरिक्त. मुख्य सचिव (आरोग्य), केरळ, डॉ. के. मदन गोपाल (MBBS, MD) सल्लागार – सार्वजनिक आरोग्य प्रशासन विभाग, राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्र, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, श्री राजेंद्र पाठक संस्थापक विश्वस्त, चाइल्ड हेल्प फाउंडेशन, डॉ. अमोल अन्नदाते बालरोगतज्ञ, नवजात तज्ञ, गहन तज्ञ, लेखक आणि वक्ता या तज्ञांनी प्रामुख्याने चर्चा केली.

कार्यक्रम दरम्यान मिरा भाईंदर शहरात CSR च्या माध्यमातून महानगरपालिकेस सहकार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना प्रशस्तीपत्र व  सन्माचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कॉंक्लेव्हमध्ये सहभागी तसेच ब्रॅण्डिंग पार्टनर असलेले NITI आयोग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA), महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी प्रकरणाचा (MSInS), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई (IIT मुंबई), CEGP (सेंटर फॉर एज्युकेशन गव्हर्नन्स अँड पोलिसी ), आगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया, बिस्लेरी, IFAT इंडिया, उपस्थित सहभागी, तज्ञ, सामाजिक संस्था, पत्रकार बंधू, डिजिटल मीडिया व उपस्थित नागरिकांचे विशेष आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिकेत CEGP फाउंडेशन (सेंटर फॉर एज्युकेशन गव्हर्नन्स अँड पोलिसी ) मार्फत कार्यरत असणारी innovation cell च्या (नाविन्यता कक्ष) पूर्ण टीमने हा कार्यक्रम उत्तमरीत्या संपन्न करण्यासाठी मागच्या काही दिवसात कल्पकतेने केलेलं अथक परिश्रम आणि महानगरपालिकेच्या इतर अधिकाऱ्यानी केलेलं मार्गदर्शन यांची ही दखल घेत त्यांचे मनापासून कौतुक करत कार्यक्रम उत्तमरीत्या यशस्वी केल्याबद्दल अभिनंदन केले.* भविष्यात शहरातील नागरिकांच्या अन्य सोयी सुविधांवर लक्ष केंद्रित करून याप्रकारची परिषद पुन्हा एकदा आयोजित करण्याचा मानस मिरा भाईंदर महानगरपालिकेचा असेल असे प्रतिपादन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले.